

# बदल

आशीष रायचूर

**केवळ विनामूल्य वितरणासाठी**
**ऑल पीपल्स चर्च अँड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे मुद्रित व वितरित.**
**प्रथम संस्करण मुद्रित,**
**संपर्क** : All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA
Phone: +91-80-25452617
Email: bookrequest@apcwo.org
Website: **apcwo.org**
अन्यथा सूचित केले नसल्यास, बायबलचे सर्व संदर्भ पवित्र बायबल, बायबल सोसायटी ऑफ इंडिया आवृत्तीतून घेण्यात आले आहेत. सर्व हक्क स्वाधीन.
बायबल व्याख्या, इब्री व ग्रीक शब्द तसेच त्यांचे अर्थ खालील पुस्तकांतून घेण्यात आले आहेत:
Thayer's Greek Definitions, Published in 1886,1889; public domain
Strong's Hebrew and Greek Dictionaries, Strong's Exhaustive Concordance by JamesStrong, T. D.LLD. Published in 1890; public domain
Vine's Complete Expository Dictionary of Old and New Testament Words,@1984,1996, Thomas Nelson, Inc, Nashville, TN.

**आर्थिक साझेदारी**

**या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे “ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी” हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**डाक यादी**

आमची नवीन पुस्तके मिळविण्यासाठी आपणास आपले नाव आमच्या डाकयादीत नोंदवावयाचे असल्यास कृपया ईमेलद्वारे आपला अचूक पत्ता आम्हास पाठवावा

**apcwo.org**

**भारतात विनामूल्य बल्क**

# बदल

# अनुक्रमणिका

1. बदल एक आवश्यक प्रक्रिया 1

2. आमचे हेतू आणि इच्छा यांत बदल 4

3. आमचे विचार, प्रवृत्ती, भाषा आणि वर्तन 6

4. अनपेक्षित बदलासाठी तयार 8

5. बदल - प्रगती आणि बढतीसाठी आवश्यक 10

6. बदलाचा आत्मा 11

प्रार्थना 13

# 1. बदल एक आवश्यक प्रक्रिया

बदल! आमच्या सभोवताली गोष्टी सतत बदलत असतात. आम्ही जगभरात सामाजिक राजकीय, आर्थिक आणि इतर अनेक बदल घडताना पाहत असतो. सर्व काही नेहमीच सारखे असते असे नाही. “आज जगात एक गोष्ट स्थिर आहे आणि ती म्हणजे बदल!” “बदल” शब्द एखादी घटना किंवा प्रक्रिया दाखवतो ज्यामुळे वस्तू त्यांच्या वर्तमान दशेपासून भिन्न असतात.

बदल ख्रिस्ती व्यक्तीसाठी सुद्धा महत्त्वाचा आहे! आमच्या ख्रिस्ती जीवनाची सुरुवात पश्चातापाने झाली, जो मुख्यत्वेकरून अंतःकरणाचा आणि मनाचा, पापापासून आणि सैतानापासून जिवंत परमेश्वराकडे बदल आहे. त्याच क्षणी परमेश्वराने आम्हाला आतून बदलून टाकले. आमचा नव्याने जन्म झाला! आम्ही ख्रिस्तामध्ये नवी उत्पत्ती झालो. एका क्षणात परमेश्वराने आमच्यामध्ये निर्माण घडवून आणला आणि आम्हास अंधारातून प्रकाशात, सैतानाच्या बंधनापासून मुक्त करून ख्रिस्तामध्ये स्वतंत्र केले. ख्रिस्ती जीवन ही बदलाची सतत प्रक्रिया आहे. परमेश्वराने आम्हाला आधीपासूनच ठरविले आहे की आम्ही *“आपल्या पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे बनावे”* (रोम 8:29अ). बदलाच्या सतत प्रक्रियेद्वारे आम्ही पूर्वी जसे होतो त्यातून बदलून पूर्णपणे ख्रिस्तासमान झालो. आपण त्या बदलाच्या थोर दिवसाकडे आशेने पाहत आहोत जेव्हा स्वतः प्रभू येशू ख्रिस्त स्वर्गातून कर्ण्याच्या नादासोबत उतरून येईल आणि निमिषभरात आम्ही सर्व बदलून जाऊ (1 करिंथ 15 51-52). जे मरणाधीन आहे ते अमरत्व धारण करतील. *“कारण जसा तो आहे तसाच तो आपल्याला दिसेल”* (1 योहान 3:2ब).

ख्रिस्तामधील आमच्या जीवनाची सुरुवात त्वरित बदलाच्या घटनेने घडून आली आणि तिचा शेवट दुसऱ्या बदलाच्या तात्कालिक घटनेत होतो. तथापि या दोन बिंदुंमध्ये बदलाची एक सतत प्रक्रिया आहे. हे पुस्तक त्या विषयावर विचार करते आणि मुख्यत्वेकरून प्रेरणादायक आहे आणि बदलाच्या या सतत प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होण्यासाठी आम्हास प्रोत्साहन देणे हा त्याचा हेतू आहे. आम्ही आमच्या जीवनातील अशा क्षेत्रांवर विचार करू ज्यांस बदलाच्या प्रक्रियेच्या अधीन होण्याची गरज आहे.

**2 करिंथ. 3:18**

**परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसलेले आपण सर्व जण आरशाप्रमाणे ‘प्रभूच्या वैभवाचे’ प्रतिबिंब पाडत आहोत; आणि प्रभू जो आत्मा त्याच्या द्वारे, तेजस्वितेच्या परंपरेने, आपले रूपांतर होत असता आपण त्याच्याशी समरूप होत आहोत.**

जर आमचे लक्ष प्रभूवर केंद्रित असेल, तर तो याचा अटळ परिणाम आहे की आम्ही त्याच्या प्रतिरूपात बदलून जाऊ. खरे म्हणजे, आम्ही त्याच्या जितके जवळ जाऊ जितके जास्त आम्ही त्याच्या तेजस्वितेकडे, गौरवाकडे पाहू, तितके अधिक आम्ही आमच्या जीवनातील ती क्षेत्रे ओळखावयास सुरूवात करू ज्यांत बदल घडवून आणण्याची गरज आहे. हे वचन आम्हास सांगते की आम्ही “बदलत आहोत” (कृपा करून चालू वर्तमान काळ सूचित करतो की ती क्रिया सुरू आहे). आम्ही बदलत असतांना, आपण तेजस्वितेकडे, गौरवापासून गौरवाकडे प्रगती करीत आहोत. म्हणून बदल ही एक आवश्यक प्रक्रिया आहे ज्यात आपण एका क्षेत्रापासून दुसऱ्या क्षेत्राकडे वाढत जातो. यामुळे आत्मिक वाढ किंवा प्रगती घडून येते. बदलावाचून आध्यात्मिक वाढ होऊ शकत नाही कारण वाढ स्वतः एक बदलाची प्रक्रिया आहे. आमचा विश्वास आहे की परमेश्वराची ही इच्छा आहे की त्याच्या कोणत्याही मुलांनी अधिक काळपर्यंत त्याच आध्यात्मिक दशेत राहावे. आम्ही कुंठित आणि अवरूद्ध व्हावे अशी परमेश्वराची इच्छा नाही.

जेव्हा आमच्या आध्यात्मिक जीवनांची बाब येते, तेव्हा आमच्या दैनंदिन अस्तित्वाच्या प्रत्येक पैलूत हे दिसून आले पाहिजे. आपण आपल्या व्यक्तिमत्वात, वर्तनात, बुद्धीत, कौशल्यात, योग्यतेत, पैश्यात, योजनेत, ध्येयात, आणि यासारख्या गोष्टींत बदलाचे स्वागत केले पाहिजे. आमच्या जीवनांच्या प्रत्येक क्षेत्रात “तेजस्वितेचा परंपरेत” (गौरवापासून गौरवाकडे) पुढे वाढण्याचा प्रयत्न करण्यासाठी दृढनिश्चय आणि बुद्धिमान असले पाहिजे. खरे पाहता, परमेश्वरास पृथ्वीवरील आमच्या जीवनांच्या प्रत्येक तपशीलात रूचि आहे - शिक्षण, करियर, कुटूंब, व्यवसाय, आणि सेवा. यापैकी प्रत्येक क्षेत्रात, नेहमीच उच्च आणि उत्तम गोष्टी असतात ज्यासाठी आम्ही प्रयत्न केला पाहिजे.

उदाहरणार्थ, आपण एक यशस्वी डॉक्टर आहात, आपण बरे होण्यासाठी प्रयत्न करू शकता. कदाचित आपण नवीन पद्धतींचा विचार करू शकता ज्याद्वारे ज्यांना उपचाराची सोय प्राप्त करता येत नाही, किंवा उपचाराची साधने नाहीत अशा लोकांसाठी आपण औषध आणण्यात मदत करू शकता. आपण अशा गोष्टी करण्याचा विचार करू शकता ज्या पूर्वी आपल्या योजनेचा भाग नव्हत्या. विद्यार्थी या नात्याने, आपण आपल्या ज्ञानात आणि कार्यक्षमतेत सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करू शकता. गृहिणी म्हणून, आपण देखरेख आणि आपल्या कुटुंबास जे सुख देता त्याच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याचा प्रयत्न करू शकता. सेवक या नात्याने आपण आपल्या वक्तृत्वकलेत आणि व्याख्याशास्त्रात सुधारणा करण्याचा प्रयत्न करू शकता. तथापि, जर आपण “बदलण्यास” इच्छुक असाल तर यापैकी प्रत्येक गोष्ट शक्य होईल. पुढील प्रकरणांत, आपण

बदल

बदलाचा काही क्षेत्रांवर विचार करू या.

# 2. आमचे हेतू आणि इच्छा यांत बदल

**स्तोत्र 51:10**

**हे देवा, माझ्या ठायी शुद्ध हृदय उत्पन्न कर; माझ्या ठायी स्थिर असा आत्मा पुन्हा घाल.**

आमचे हेतू आणि इच्छा अत्यंत महत्वपूर्ण आहेत. आम्हास हे समजण्याची गरज आहे की अतिशय आध्यात्मिक आणि सत्प्रवृत्त ख्रिस्ती विश्वासणाऱ्याचे हेतू आणि इच्छा काही बाबतीत चुकीचे असू शकतात. आमच्यापैकी कोणीही या सारख्या वाईटाविरूद्ध सहज सुरक्षित नाही. त्याऐवजी, आम्हास या गोष्टींविरूद्ध सतत सावध असले पाहिजे. प्रभू आम्हास उपदेश देतो, *"सर्व रक्षणीय वस्तूंपेक्षा आपल्या अंत:करणाचे विशेष रक्षण कर, कारण त्यात जीवनाचा उगम आहे"* (नीतिसूत्रे 4:23). चुकीच्या हेतूंचे गुलाम बनण्यापासून स्वतःच्या अंतःकरणाचे रक्षण करण्याची जबाबदारी आमची आहे. जर आम्ही आपल्या अंतःकरणांचा माग घेतला आणि खरोखर असे हेतू आणि इच्छा आहे हे ओळखले तर त्यात काहीही वावगे नाही. हे महत्वपूर्ण आहे आणि बदलाकडे पहिले पाऊल आहे. पवित्र शास्त्र आम्हास वारंवार सांगते की आम्ही स्वतःचे परीक्षण केले पाहिजे.

**1 करिंथ. 11:28**

**म्हणून माणसाने आत्मपरीक्षण करावे आणि मग त्या भाकरीतून खावे व त्या प्याल्यातून प्यावे.**

**1 करिंथ. 11:31**

**आपण आपला न्यायनिवाडा केला असता तर आपल्यावर दंड ओढवला नसता.**

**2 करिंथ. 13:5**

**तुम्ही विश्वासात आहात किंवा नाही ह्याविषयी आपली परीक्षा करा; आपली प्रतीती पाहा, येशू ख्रिस्त तुमच्या ठायी आहे असे तुम्ही स्वतःसंबंधाने समजता ना? नाहीतर तुम्ही पसंतीस उतरलेले नाही.**

## सेवेतील हेतू

चुकीचे हेतू आणि इच्छा ओळखल्यानंतर आम्हाला त्यांस कबूल करण्याची आणि प्रभूला आमच्यात बदल घडवून आणण्याची विनंती करण्याची गरज आहे. दावीदासमान प्रार्थना करा : *"हे देवा, माझ्या ठायी शुद्ध हृदय उत्पन्न कर; माझ्या ठायी स्थिर असा आत्मा पुन्हा घाल"* (स्तोत्र

51:10). वैय्यक्तिकरित्या, आमच्या स्वतःच्या जीवनात लोकांची सेवा करीत असतांना, आम्ही स्वतःस अनेक वेगवेगळया क्षेत्रांत चुकीच्या हेतूंविरूद्ध स्वतःचे रक्षण केले पाहिजे. आम्हाला स्वतःस हे विचारण्याची गरज आहे, “हे मी का करीत आहे? माझा हेतू काय आहे? माझी खरी इच्छा काय आहे?” उदाहरणार्थ, जर आम्हाला एखाद्या ठिकाणी सेवा करण्यासाठी निमंत्रित करण्यात आले, तर आपण प्रभूला विनंती केली पाहिजे की तेथे जाण्यापूर्वी आपली अंतःकरणे तयार करावी आणि आम्हास शुद्ध हेतू द्यावा. आमच्या सेवेस जी देणगी दिली जाते त्यावर लक्ष केंद्रित करण्यापासून आम्ही आपल्या हृदयाचे रक्षण केले पाहिजे. परमेश्वराच्या प्रीतीच्या आणि सामर्थ्याच्या अलौकिक प्रदर्शनाची इच्छा धरीत असतांना, “अत्यंत अभिषिक्त परमेश्वराचे सेवक ” म्हणून मान्यता मिळविण्याच्या गुप्त हेतूपासून आपण आपल्या अंतःकरणाचे या रक्षण केले पाहिजे. सेवेत वाढण्याचा प्रयत्न करीत असतांना, आम्हास आमच्या स्वतःच्या “सेवेची” अथवा “राज्याची” वाढ करण्याच्या इच्छेपासून आपल्या अंतःकरणाचे रक्षण करण्याची गरज आहे. आपण सतत स्वतःस ही आठवण करून देण्याची गरज आहे की हे “परमेश्वराचे कार्य” नाही, तर “आमचे कार्य” आहे. आणि हे “परमेश्वराचे राज्य” आहे, “आमचे राज्य” नाही.

मी सेवेत जागरूकतेच्या महत्वावर जोर दिला आहे कारण आमचे हेतू आणि इच्छा आमच्या जीवनातील अनेक गोष्टी ठरवितात आणि प्रभावित करतात. सर्वात जास्त म्हणजे, परमेश्वर आमच्या बाहेरील अभिव्यक्तींपलीकडे पाहतो. *“मानवासारखे परमेश्वराचे पाहणे नसते; मानव बाहेरचे स्वरूप पाहतो पण परमेश्वर हृदय पाहतो”*(1 शमुवेल 16:7ब). परमेश्वराची इच्छा आहे की आमच्या आंतरिक मनुष्यत्वात सत्य असावे (स्तोत्र 51:6). आपले हेतू आणि इच्छा या विषयी सदा जागृत असा. ते जर योग्य नसतील, तर प्रभूजवळ जा आणि त्याला विनंती करा की त्याने आपणात बदल घडवून आणावा!!

# 3. आमचे विचार, प्रवृत्ती, भाषा आणि वर्तन

**रोम. 12:2ब**

**म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वतरूचे रूपांतर होऊ द्या.**

**इफिस 4:23**

**आणि तुम्ही आपल्या मनोवृत्तीत नवे व्हावे.**

**1 तीमथ्य. 4:12**

**कोणी तुझ्या तारुण्याला तुच्छ मानू नये; तर भाषण, वर्तन, प्रीती, (आत्मा), विश्वास व शुद्धता ह्यांविषयी विश्वास ठेवणाघर्‍यांचा कित्ता हो.**

प्रभू आमच्या विचारात आणि वृत्तीमध्ये बदल पाहू इच्छितो. *"आपल्या मनाच्या नवीकरणाने"* (रोम 12:2) दर्शविते की आमच्या दृष्टिकोनात, प्रवृत्तीमध्ये, आणि ज्याप्रकारे आपण विचार करतो त्यामध्ये बदल घडून आला पाहिजे. याचे अनेक पैलू आहे. आपण "जगीक विचार" करण्यापासून अथवा "जगीक" वृत्ती बाळगण्यापासून बदल केला पाहिजे आणि परमेश्वराचे विचार आणि वृत्ती धारण करावी. आपण "खालच्या" स्तरावरील विचार करण्यापासून मुक्त होण्याची आणि आपले आदर्श उंचवून वचनांनुसार आणि विश्वासाच्या दृष्टिकोनातून विचार करण्याची गरज आहे. आमच्यापैकी काहींना आपल्या निराशावादापासून मुक्त होण्याची, "असे होऊ शकत नाही" या नकारात्मक दृष्टिकोनापासून परावृत्त होण्याची गरज आहे, आणि आपण परमेश्वरामधील सरळ विश्वासाद्वारे उपलब्ध मोठ्या शक्यता पाहण्यास सुरूवात करावी. आमच्यापैकी काही "जुन्या पद्धतीने" काम करण्यात इतके गुंतलेले असतो की आपण "ताजे आणि नवे" स्वीकारण्यास अनिच्छुक असतो जे स्वतः प्रभू करू इच्छितो. आमच्या धार्मिक प्रथा आणि परंपरांनी आमच्या विचारास असे बांधून ठेवले आहे की आम्ही असे गृहीत धरतो की आम्हास जसे शिकविण्यात आले आहे त्याशिवाय दुसऱ्या पद्धतीने आम्हाला ते करता येत नाही.

आणखी काही लोकांस अशी स्वप्ने आहेत जी अतिशय लहान आहे, अशा महत्वाकांक्षा आहेत ज्या

अगदी छोट्या आहेत, दृष्टांत आहेत जे अगदी मंद आहेत की त्यांस या क्षेत्रांत बदल पाहण्याची गरज आहे. आम्हाला मोठी स्वप्ने पाहण्याची, परमेश्वरासाठी फार काही संपादन करण्याची इच्छा, आणि अशी दर्शने बाळगण्याची गरज आहे ज्याद्वारे जगात बदल घडून येईल. आमच्यापैकी काही - वैफल्य, पराजय, निराशा, अथवा संकट यांच्या अनुभवामुळे - औदासिन्य, लाचारी, अथवा नैराश्याच्या स्थितीत पडलेले आहेत. त्यांच्याठायी प्रगती आणि वाढीची कुठलीही प्रेरणा, इच्छा, प्रयत्न नाही. जर आपण परमेश्वरास आमचे थोडे फार सहकार्य देण्यास इच्छुक असू, तर परमेश्वर ते सर्वकाही बदलू शकतो!! काही लोक अगदी आळसी असू शकतात, गोष्टींविषयी निष्काळजी, आणि अतिशय उदासीन असू शकतात. आम्हास आमच्या वृत्तींमध्ये मोठ्या बदलाची गरज आहे!! काही लोक सतत आपल्या कामात विलंब करीत असतात, आणि त्यांना त्याबाबत बदल करण्याची गरज आहे. काही लोक योजना बनवितात आणि खूप बोलतात, पण आपला "हात नांगराला लावत नाहीत." यात सुद्धा बदल घडून आला पाहिजे. काही लोक भिती, गर्व, कटुत्व अथवा परमेश्वरास प्रसन्न न करणाऱ्या चरित्रगुणांच्या बंधनात आहेत, आणि तो हे बदलतांना पाहू इच्छितो. परमेश्वर आमच्या बोलण्यात आणि वागण्यात आम्हाला उंच पातळीवर नेऊ इच्छितो. आमचे बोलणे आणि वागणे विश्वासणाऱ्यास शोभेल असे असावे.

वैय्यक्तिकरित्या, आम्हाला आपल्या जीवनात जेव्हा आपल्या योग्य नसलेल्या विचारांबाबत अथवा वृत्तींविषयी जाणीव होते, तेव्हा आम्हास प्रभूजवळ जाऊन त्याच्यापुढे हे कबूल करण्याची आणि प्रार्थना करण्याची गरज आहे की तो आम्हास बदलून टाकील. प्रभूसोबत अनेक वर्षे चालल्यानंतरही, आम्ही अद्याप आमच्या जीवनातील ती क्षेत्रे ओळखतो ज्यांत बदल घडवून आणण्याची गरज आहे. आपण आपल्या स्वतःच्या जीवनातील त्या प्रवृत्ती आणि विचार ओळखू शकता का जे आपण परमेश्वराजवळ आणू इच्छिता आणि म्हणता, "प्रभू, मला माझ्या जीवनात हे बदललेले पाहण्याची गरज आहे?"

# 4. अनपेक्षित बदलासाठी तयार

**योहान 3:8**

**वारा पाहिजे तिकडे वाहतो आणि त्याचा आवाज तुम्ही ऐकता, तरी तो कोठून येतो व कोठे जातो हे तुम्हांला कळत नाही; जो कोणी आत्म्यापासून जन्मलेला आहे त्याचे असेच आहे.**

आत्म्याने जन्म पावल्याने आमचा प्रवेश अशा जीवनात होतो जेथे सर्व गोष्टी पूर्णपणे स्पष्ट करता येत नाहीत. काही गोष्टींबाबत समर्पण करण्याची आणि त्यांचा अनुभव करण्याची गरज असते. प्रभू येशूने आत्म्याद्वारे घडवून आणलेल्या नव्या जन्माची तुलना वाऱ्याशी केली आहे जो हवा तेथे वाहतो. आपण त्याचा केवळ अनुभव करू शकतो. आम्हास त्याचा निश्चित आरंभ अथवा गंतव्य स्थान माहीत नसते. म्हणून सुद्धा, आत्म्याची अनेक कामे पूर्णपणे स्पष्ट करता येत नाहीत. काही घडले आहे ते आपण केवळ अनुभवू शकतो आणि जाणू शकतो. कधी कधी प्रभू आमच्या जीवनातील घटना आणि परिस्थितींना एकत्र आणतो, ज्या आमच्यासाठी पूर्णपणे अनपेक्षित असतात. आम्हाला या गोष्टीचे पूर्ण ज्ञान नसते की आमचा सामना अशा गोष्टींशी होईल. त्या आमच्या योजनांचा भाग नव्हत्या. तथापि, प्रभूस शरण जाणे आणि "वारा जेथे वाहतो तेथे जाणे " शहाणपणाचे आहे. अनपेक्षित बदलांसाठी तयार असण्यास शिकणे अतिशय महत्वाचे आहे, जे बदल प्रभू आमच्या जीवनात घडवून आणतो. ते आमच्या जीवनातील परिवर्तन बिंदू असू शकतात.

## आमच्या सेवेत बदल

एमी (माझी पत्नी) आणि मी अनेक घटनांविषयी सांगू शकतो की कशाप्रकारे परमेश्वराने अनपेक्षित बदलांचा उपयोग करून आम्हाला अशा गोष्टींकडे पुढे नेले ज्या त्याने आमच्यासाठी राखून ठेवल्या होत्या. 1995च्या सुमारास, माझे वडील व्यवसायाच्या निमित्ताने अमेरिकेस गेले. त्यांनी मी राहत असलेल्या न्यू जर्सीच्या न्यू ब्रून्सविक येथे एक रात्र थांबून मला भेट देण्याचे ठरविले. ते शनिवारी आले आणि दुसऱ्या दिवशी सायंकाळी ते जाणार होते. माझ्या वडिलांस नेहमीच आफ्रिकन अमेरिकन मंडळीस भेट देण्याची इच्छा होती कारण त्यांचे गायन आणि उपासनेची शैली अनुभवण्याची त्यांची नेहमी इच्छा असे. मी त्यापूर्वी कधीही तशाप्रकारची उत्साहपूर्ण उपासना, स्वतःप्रेरित गाणे कधीही पाहिले किंवा अनुभव केले नव्हते. ते अतिशय उंच

स्वरात होते, कर्णबधीर करणारे होते, आणि असे वाटले की इमारत खाली येईल! कमीत कमी मला तसे वाटले! त्यावेळेपर्यंत, मी विद्यापीठातील कोरियन अमेरिकन बंधूभगिनींशी सहभागित्व करीत होतो. आम्ही स्तवनात स्वातंत्र्याचा अनुभव करीत होतो, तरीही त्याची तुलना मी तेथे जे पाहिले त्याच्याशी होत नव्हती. त्यावेळी माझ्या मनात हजारो विचार आले. मी आपल्या अंतःकरणात सखोलपणे हे जाणले की उपासनेत असे स्वातंत्र्य योग्य होते. माझी नेहमी अशी इच्छा होती की प्रभूसमोर स्तुती व उपासना व्यक्त करण्यास आम्ही स्वतंत्र असले पाहिजे. पण या आफ्रिकन अमेरिकन मंडळीत जे घडत होते त्याच्या तुलनेत, मी वीटेच्या भिंतीसारखा ताठ असल्यासारखे वाटत होते. नंतर त्या दिवशी जेव्हा मी एकटा होतो, तेव्हा मला फार गोंधळल्यासारखे वाटले. माझ्यातील एक भाग म्हणाला, “प्रभू, मला तेथे पुन्हा जावयाचे नाही. मला त्यांच्यासारखे कधीही बनता येणे शक्य नाही. आणि मला तो आवाज सहन होणार नाही.” माझ्यातील दुसरा भाग म्हणाला, “प्रभू, त्यांच्याजवळ जे आहे ते मला खरोखर हवे आहे - तुझी उपासना करण्यासाठी तशाप्रकारचे स्वातंत्र्य.” सारांश म्हणजे, मी तेथे परत गेलो आणि जेव्हा एमीदेखील माझ्यासोबत आली, तेव्हा आम्ही दोघे एकत्र परत गेलो. फारच थोड्या काळात, मला त्या मंडळीत सेवा करण्याची संधी मिळाली आणि आम्ही दर बुधवार रात्री तसे करीत असू. आम्हास अति उत्तम आफ्रिकन अमेरिकन बंधू भगिनींची भेट घेता आली. आमची भेट मॅन्यूएल आणि तानियाशी झाली, हे स्पॅनिश बोलणारे दाम्पत्य तेथे आलेले होते. नंतर, आम्हाला ते रोपण करीत असलेल्या हिस्पॅनिक मंडळीत सेवा करण्यासाठी निमंत्रण देण्यात आले. त्यानंतर लवकरच, आम्ही हिस्पॅनिक मंडळीच्या जीवनात आणखी बरेच काही सामायिक करू शकलो. मॅन्युएल आणि तानिया वचनाचा अभ्यास करण्यासाठी दर आठवड्यास आमच्यासोबत वेळ घालवित. एमीने हिस्पॅनिक मंडळीच्या संगीत सेवेत मदत केली आणि त्यांच्या मदतीने आम्ही नोव्हेंबर 1996 मध्ये सेवेसाठी इक्वाडोर येथे गेलो! न्यू ब्रून्सविकमध्ये एक रात्र माझे वडील थांबले त्याची श्रृंखला प्रक्रिया म्हणून काय काय घडून आले ते पाहा!! अनपेक्षित? अवश्य!! आपण त्याची योजना आखली का? निश्चितच नाही!! आम्ही केवळ तेथे जावयास शिकलो जेथे आत्म्याचा वारा वाहत होता. आम्ही कधीही कल्पना केली नाही की आम्ही आफ्रिकन अमेरिकन किंवा हिस्पॅनिक समुदायांस भेट देऊन तेथे सेवा करू. जेथे कोठे तो वाहू इच्छितो, तेथे आम्ही जाणार!! अनपेक्षित बदलासाठी तयार आणि तत्पर असा जे परमेश्वर आपल्या जीवनात घडवून आणू इच्छितो.

# 5. बदल - प्रगती आणि बढतीसाठी आवश्यक

**योहान 12:24**

**मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, गव्हाचा दाणा जमिनीत पडून मेला नाही तर तो एकटाच राहतो, आणि मेला तर पुष्कळ पीक देतो.**

आपण तेजस्वितेच्या परंपरेने “बदलत” जातो. म्हणून आज आम्ही अनुभवित असलेल्या तेजस्वितेपासून अथवा गौरवाच्या पातळीपासून दुसऱ्या पातळीकडे जाण्यासाठी आधी आपण बदलले पाहिजे. ज्या गोष्टी आम्हाला थोपवून धरतात आणि आमच्या प्रगतीमध्ये अडथळा आणतात - त्या बदलल्या पाहिजेत. आम्ही उठून या गोष्टी जशा आहेत त्यासाठी कबूल केल्या पाहिजेत आणि परमेश्वराच्या मदतीने, आम्ही त्यांस बदलतांना पाहिले पाहिजे. आज आम्ही जेथे आहोत त्यावर विचार केला पाहिजे की जणू काही आम्ही त्या एका “गव्हाच्या दाण्याद्वारे” प्रतीकस्वरूपात दर्शविले जात आहोत. जर आम्ही त्या परिस्थितीत वाढू इच्छितो जेथे आम्ही “पुष्कळ पीक” आणू शकू, तर आम्ही “जमीनीत पडून” “मेले” पाहिजे, मग “पुष्कळ पीक” देऊ. ही आमच्यातील बदलाची प्रक्रिया आहे. आम्ही प्रथम जमीनीवर पडले पाहिजे आणि त्यासाठी नम्रतेची गरज आहे. हे तथ्य स्वीकारण्यासाठी आमच्या वतीने नम्रतेची गरज आहे की आम्हास बदलण्याची गरज आहे. आम्ही स्वतःस मेले पाहिजे. कधी कधी ही दु:खद प्रक्रिया असू शकते. मग आम्हास पुढील तेजस्वितेच्या, गौरवाच्या पातळीकडे उंचविले जाईल, अशाप्रकारे प्रगतीचा आणि वाढीचा अनुभव होईल.

# 6. बदलाचा आत्मा

**उत्पत्ती 1:1-3**

**1 प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली.**

**2 आणि पृथ्वी आकारविरहित व शून्य होती, जलनिधीच्या पृष्ठभागावर अंधकार होता आणि देवाचा आत्मा जलावर तळपत राहिला होता.**
**3 तेव्हा देव बोलला, "प्रकाश होवो," आणि प्रकाश झाला.**

प्रभूचा आत्मा आम्हास तेजस्वितेच्या परंपरेने बदलत चालला आहे. पवित्र आत्मा आमच्यात बदल घडवून आणणारा अभिकर्ता आहे. पृथ्वी आकारविरहित, शून्य, आणि अंधकारमय होती. पण तरीही परमेश्वराचा आत्मा पाण्यावर तळपत होता. परमेश्वर शब्द बोलला, "प्रकाश होवो" (उत्पत्ती 1:3) आणि परमेश्वराचा पराक्रमी पवित्र आत्मा अंधारात प्रकाश घेऊन आला.

हे अतिशय महत्वाचे आहे की परमेश्वराचा आत्मा या निराकार, अंधकारमय, आणि शून्य पृथ्वीतलावर त्यावेळी तळपत होता जेव्हा परमेश्वर ते निर्माणशील आणि पुनर्स्थापक शब्द बोलावयास तयार होता. आम्हास खात्री आहे की परमेश्वराचा आत्मा हा बदलाचा आत्मा आहे. तोच बदल आणि रूपांतर घडवून आणतो. जेव्हा पृथ्वीची पुनर्स्थापना झाली तेव्हा त्याने ते मोठ्या प्रमाणात केले (उत्पत्ती 1). मग, आम्ही कितीतरी अधिक अपेक्षा करू शकतो की त्याने परमेश्वराच्या गौरवाने भरून आणि आमच्यात बदल घडवून आमच्या जीवनात कार्य करावे, यासाठी की आम्हास त्याच्या दृष्टीत चांगले बनता यावे. आम्ही त्यास ज्या प्रमाणात शरण जातो, त्याच प्रमाणात तो आमच्यात कार्य करतो. आपले अंतःकरण पवित्र आत्म्यापुढे मोकळे करा. स्वतःस त्याजपुढे समर्पित करा आणि त्याला विनंती करा की त्याने तुमच्यात बदल घडवून आणावा. तुमच्या जीवनातील त्या क्षेत्रात मदत करण्यासाठी त्याला विनंती करा ज्यांत बदलाची गरज आहे.

## परमेश्वराचे वचन बदल घडवून आणते

परमेश्वराच्या उत्पत्तीच्या आणि पुनर्स्थापनेच्या कामात, पवित्र आत्मा पृथ्वीतलावर तळपत होता, पण त्याचवेळी अंधकारावर आणि शून्यतेवर परमेश्वराचा शब्द बोलला गेला (उत्पत्ती 1).

तरीसुद्धा, आत्मा आणि शब्द एकत्र मिळून आमच्या जीवनांत बदल घडवून आणतात. आपल्या अंतःकरणास व मनास परमेश्वराच्या वचनापुढे मोकळे करा. स्वतः परमेश्वराचे वचन वाचा आणि त्यावर मनन करा आणि परमेश्वराचे वचन त्याचे परिवर्तनकारक सामर्थ्य आपल्या जीवनात मुक्त करू लागेल.

# प्रार्थना

प्रभू, मला बदल!

*प्रिय पित्या, मी येशूच्या नावात तुझ्याजवळ येतो. प्रभू, माझ्या जीवनात अशा गोष्टी आहेत, ज्या मला दिसून येतात, ज्यात बदलाची गरज आहे. प्रभू तुझ्या वचनाच्या आणि आत्म्याच्या सामर्थ्याद्वारे माझ्यात बदल घडवून आण. माझी इच्छा आहे की जेथे मी आहे तेथून मला काढून तू जेथे आहेस तेथे मला न्यावे. मी जे बनावे असे तुला वाटते ते मी बनावे अशी माझी इच्छा आहे. तुझ्याजवळ माझ्यासाठी जे काही आहे ते मला प्राप्त करावयाचे आहे. प्रभू, माझ्या मनात व माझ्या हृदयात बदल घडवून आण. माझे हेतू, माझी प्रवृत्ती, माझे बोलणे, आणि माझ्या वर्तनात बदल घडवून आण. परमेश्वराच्या गोष्टींत प्रगती करण्यासाठी आणि वाढण्यासाठी अडखळण आणणाऱ्या गोष्टींपासून मला सुटका दे. आमेन.*

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळयांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (ब) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (क) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक/बैंक ड्राफ्टच्या द्वारे "ऑल पीपल्स चर्च, बेंगलोर" च्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता:

Account Name: All Peoples Church

Account Number: 0057213809

IFSC Code: CITI0000004

Bank: Citibank N.A., No. 5,

M.G. Road, Bengaluru, Karnataka 560001

कृपया लक्षात ठेवाः ऑल पीपल्स चर्चजवळ एफसीआरए परमिट नाही. या कारणास्तव केवळ भारतीय नागरिकांचे बँक अंशदान स्वीकार करता येणार नाही. आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणज्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता.

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!

## FREE PUBLICATIONS

A Church in Revival*
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks*
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change*
Code of Honor
Divine Favor*
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling*
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Giving Birth to the Purposes of God*
God Is a Good God
God's Word
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife*
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don't Take Them
Open Heavens*
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith *
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus *
The Night Seasons of Life
The Power of Commitment*
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power*
The Wonderful Benefits of speaking in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different*
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work Its Original Design

वरील सर्व पुस्तके पीडीएफ आवृत्तीत विनामूल्य डाऊनलोडसाठी आमच्या चर्चच्या संकेतस्थळावर **apcwo.org/publications** उपलब्ध आहेत. यापैकी काही पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. ह्या पुस्तकांची विनामूल्य मुद्रित प्रत प्राप्त करण्यासाठी ई-मेल या डाकद्वारे आमच्याशी संपर्क करावा.

तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी : **apcwo.org**

# ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च (एपीसी) चा दृष्टांत आहे.

एपीसीमध्ये आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌भुत कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4,5; इबी. 2:3,4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी : **www.apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा : **contact@apcwo.org**

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळयांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌भुत गोष्टी केल्या.

ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, "**पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे**" (**रोमियों 6:23**). येशूने जेव्हा वधस्तंभावर जेव्हा आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला. देव प्रीती आणि दयेचा देव आहे.

त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो पाप्यांस तारावयास - आपल्यासाख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे - प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

**"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात" (प्रेषितांची कृत्ये 10:43).**

**"की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल" (रोम. 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याच्या स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.


आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.

आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते. येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर. आमेन.

# विनामूल्य ॲप डाऊनलोड करा

## ॲपमध्ये  गुगल प्ले स्टोर में "ऑल पीपल्स चर्च, बैंगलोर" शोधा.

**दररोज 5 मिनिटांच्या वीडिओच्या माध्यमाने उपासना**




दररोज बायबल वाचन आणि प्रेयर गाईड

5 मिनिटांच्या उपदेशाचा सारांश

जगात प्रगतीसाठी विविध विषयांवर पवित्र शास्त्राचे टूल किट तसेच सुवार्ता सांगण्यासाठी माहिती

उपदेश, उपदेशाच्या टीपा, टी. वी. कार्यक्रम, पुस्तके, संगीत, आणि बरेच काही.

जर हे आपणास आवडले असेल तर इतरांस सांगा.

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र (एपीसी-बीसी) भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्‌भुत कृत्ये यावर जोर दिला जातो - सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

एपीसी-बीसी मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत :

Theology and Christian Ministry (C.Th.) में एक वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम
Theology and Christian Ministry (D.Th.) में दो वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम
Bachelor in Theology and Christian Ministry (B.Th.) में तीन वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम

दर आठवड्यास सोमवार ते शुक्रवार या दरम्यान सकाळी 9 ते दुपारी 1 वाजेपर्यंत वर्ग भरलेले असतात. विद्यार्थी, नोकरी करणारे आणि गृहिणी सर्व या वर्गांमध्ये उपस्थित राहू शकतात आणि दुपारी 1 नंतर कामावर जाऊ शकतात. तेथे राहण्याची इच्छा असलेल्या स्त्री आणि पुरुषांसाठी स्वतंत्र वसतिगृहांची सोय आहे. विद्यार्थी दर आठवड्यात दोन ते पाच तास क्षेत्रीय कार्य, विशेष परिसंवाद, दुपारी प्रार्थना आणि उपासना यात घालवतात. दुपारच्या सभा घरून येणार्या विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक आहेत. आठवड्याच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना एक किंवा अधिक स्थानिक चर्चेमध्ये सेवा करण्यास प्रोत्साहित केले जाते.

कॉलेज, विविध कार्यक्रम, अभ्यासक्रम याबद्दल अधिक माहितीसाठी आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी कृपया या साइटला भेट द्या : apcwo.org/biblecollege

APC-BC is
accredited by the Nations Association
for Theological Accreditation (NATA).

बदल ख्रिस्ती व्यक्तीसाठी सुद्धा महत्त्वाचा आहे! आमच्या ख्रिस्ती जीवनाची सुरुवात पश्चातापाने झाली, जो मुख्यत्वेकरून अंतःकरणाचा आणि मनाचा, पापापासून आणि सैतानापासून जिवंत परमेश्वराकडे बदल आहे. त्याच क्षणी परमेश्वराने आम्हाला आतून बदलून टाकले. आमचा नव्याने जन्म झाला! आम्ही ख्रिस्तामध्ये नवी उत्पत्ती झालो. एका क्षणात परमेश्वराने आमच्यामध्ये निर्माण घडवून आणला आणि आम्हास अंधारातून प्रकाशात, सैतानाच्या बंधनापासून मुक्त करून ख्रिस्तामध्ये स्वतंत्र केले. ख्रिस्तामधील आमच्या जीवनाची सुरुवात त्वरित बदलाच्या घटनेने घडून आली आणि तिचा शेवट दुसऱ्या बदलाच्या तत्कालीक घटनेत होतो. तथापि या दोन बिंदुंमध्ये बदलाची एक सतत प्रक्रिया आहे. हे पुस्तक त्या विषयावर विचार करते आणि मुख्यत्वेकरून प्रेरणादायक आहे आणि बदलाच्या या सतत प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होण्यासाठी आम्हास प्रोत्साहन देणे हा त्याचा हेतू आहे.

आशीष रायचूर

**All Peoples Church & World Outreach**
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org